महाराष्ट्र शासन

# महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी

## कार्यालय- किटकशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी

फोन नं. (०२४२६) २४३२३४
फॅक्स नं. (०२४२६) २४३२३४
ई मेल आयडी- hdent_mpkv@rediffmail.com

पत्ता - मध्यवर्ती परिसर, पदव्युत्तर महाविदयालय इमारत,
महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी

जा. क्र. किशावि/क्रॉपसॅप/जाहिरात/५०६/२०२५ दिनांक-१५/७/२०२५

## 'पिकावरील किड - रोग सर्वेक्षण सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)' २०२५-२६

## जाहिरात

**कृषि आयुक्तालय, पुणे व किटकशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी** अंतर्गत कार्यरत असलेल्या राज्य स्तरावरील कापुस, सोयाबीन, भात, तुर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा **'पिकावरील किड - रोग सर्वेक्षण सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)'- २०२५-२६** मध्ये खालील तक्त्यात नमुद केलेली तातपुरत्या स्वरुपातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्हता प्राप्त उमेदवाराकडुन सोबतच्या विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | भरावयाची पदे | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतन (रुपये प्रति महिना) | काम करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संशोधन सहयोगी (किटकशास्त्र) | ०१ | किटकशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा आचार्य पदवी M.Sc. (Agri.) or Ph.D. in Entomology | पिकावरील किड व्यवस्थापना चा अनुभव धारकास प्राधान्य | एकत्रित रु. ४९०००/- M.Sc. (Agri.)/ रु. ५४०००/- Ph.D. (Agri.) + घरभाडे भत्ता (सहा महिन्यांकरीता) | **मा. कृषि संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषि आयुक्तालय साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे** |
| २ | संशोधन सहयोगी (संगणकशास्त्र) | ०१ | मास्टर ऑफ कॉम्प्युटर सायन्स/मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स/ बॅचलर ऑफ इंजीनियरिंग (कॉम्प्युटर सायन्स)/बॅचलर ऑफ इंजीनियरिंग (इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी) किंवा वरील विषयात आचार्य पदवी Master of Computer Science/Master of Computer Applications/BE-Computer Science/ BE-Information Technology or Ph.D. in above subjects | कृषि, शेती संबंधित संगणक प्रणाली इ. चा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | एकत्रित रु. ४९०००/- MCS/MCA/BE -Computer Science/BE-Information Technology/ रु. ५४०००/- Ph.D. in above subjects + घरभाडे भत्ता (सहा महिन्यांकरीता) | |

**नियम, अटी व शर्ती**

१. वयोमर्यादा- उमेदवाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (शासकीय नियमाप्रमाणे अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती व इतरांकरिता वयोमर्यादा शिथिलक्षम)

Scanned with OKEN Scanner

२. वरील पदे ही पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असुन प्रथम नियुक्ती **सहा महिन्यांकरीता** दिली जाईल.

३. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता व इतर भत्ता देय नसुन त्यांना स्वखर्चाने मुलाखतीस यावे लागेल.

४. प्रकल्पातील नियुक्ती ही पुर्णपणे कंत्राटी पध्दतीची असुन उमेदवारास कायम नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासन/विदयापीठाकडे कोणत्याही प्रकारचा हक्क/अधिकार राहणार नाही.

५. नियुक्ती झाल्यानंतर कामात टाळाटाळ वा हलगर्जीपणा, गैरकृत्य करणे वा काम समाधानकारक नसणे इ. बाबी आढळुन आल्यास, २४ तास अगोदर नोटीस देवुन सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

६. वरील नियुक्ती ही **मा. कृषि संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे** यांचे अधिनस्थ असुन दररोजचे काम व हजेरी प्रकल्पाच्या कार्यालयात/प्रयोगशाळेत राहील.

७. नियुक्त उमेदवारांनी प्रकल्प सोडण्यापुर्वी आपली देयके पुर्ण करावीत त्यानंतर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. तक्रार चालणार नाही.

८. नियुक्त उमेदवारांना पुर्ण वेळ या प्रकल्पासाठी काम करावे लागेल, नियुक्तीदरम्यान इतरत्र कोठेही नोकरी करता येणार नाही.

९. प्रकल्पात नियुक्ती असतांना इतरत्र कोणत्याही जागेसाठी अर्ज करताना **प्रमुख, किटकशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी / मा. कृषि संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे** यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुनच अर्ज करावा लागेल.

१०. प्रकल्पातील पद सोडतांना त्यांच्याकडे असणारा सर्व पदभार हा प्रकल्पातील इतर कर्मचाऱ्याकडे देवुन नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे.

११. प्रकल्पात नियुक्ती झाल्यानंतर रु. १००/- स्टॅम्प पेपरवर हमीपत्र दयावे लागेल. तसेच एक महिना अगोदर नोटीस देवुनच पद सोडावे लागेल अथवा अचानक पद सोडल्यास एक महिन्याचा पगार या कार्यालयाकडे जमा करावा लागेल.

१२. **प्रमुख, किटकशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी / मा. कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे** यांनी वेळोवेळी नेमुन दिलेली प्रकल्पाची कामे जबाबदारीने पार पाडावी लागेल.

१३. पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील भरलेला अर्ज मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह **दि. २८/०७/२०२५** पर्यंत अथवा तत्पुर्वी **प्रमुख, किटकशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहुरी** यांचे कार्यालयात (सुट्टीचे वार सोडुन) **कार्यालयीन वेळेत समक्ष हजर राहुन अथवा पोस्टाने जमा** करावेत.

१४. पोस्टाच्या विलंबाबद्दल हे कार्यालय/विदयापीठ जबाबदार असणार नाही.

१५. मुलाखतीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पडताळणी केली जाईल.

१६. वरील निवडीबाबत अयोग्य मार्गाचा अवलंब केल्यास आपणास अपात्र ठरविण्यात येईल.

१७. जाहिरातीतील पदे जाहिरात दिली म्हणजे भरली जातील असे नसुन पदे भरतीबाबतचे सर्व अधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

**प्रमुख**
**किटकशास्त्र विभाग**
**मफुकृवि, राहुरी**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. संशोधन संचालक, मफुकृवि, राहुरी
२. मा. कुलसचिव, मफुकृवि, राहुरी
३. मा. नियंत्रक, मफुकृवि, राहुरी

**प्रत माहिती व प्रसिध्दीसाठी**

४. समन्वयक, कृषि माहिती व व्यवस्थापन विभाग, मफुकृवि, राहुरी

४/- सोबत जोडलेली जाहिरात विदयापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात - **'संशोधन सहयोगी (किटकशास्त्र) व संशोधन सहयोगी (संगणकशास्त्र)'** या नावे **दि. २८.०७.२०२५** पर्यंत प्रसिध्द करावी.

Scanned with OKEN Scanner